9 MAY 2018 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठातील संशोधकांना आरआर कमिटीचे वेध

## नवीन नियमानुसार एम. फिल., पीएच. डी. गाईडच्या अधिकारात बदल : एक हजार संशोधकांची होणार आरआर

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील पीजीबीयुटीआर विभागाच्या वतीने रिसर्च अँन्ड रेकग्नेशन (आरआर) साठी सर्व अधिविभागाकडून एम. फील. पीएच. डी.च्या विद्यार्थ्यांचे प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. दोन ते तीन वेळा सूचना देवूनही अधिविभागांकडून अंजूनही प्रस्ताव पाठविलेले नाहीत. त्यामुळे विद्यापीठातील शेकडो संशोधकांना आरआर कमिटीचे वेध लागले आहेत. या कमिटीच्या निर्णयानंतरच विद्यार्थ्यांचे पुढील भवितव्य ठरणार असल्याने, लवकरात लवकर आरआर कमिटीची बैठक घ्यावी, अशी मागणी शिक्षण क्षेत्रांतून होत आहे.

**नवीन नियमावली :–** असिस्टंट प्रोफेसर : एम. फिल. साठी १ व पीएच. डी. साठी ४ विद्यार्थी. –असोसिएट प्रोफेसर : एम. फिल.साठी २ व पीएच. डी.साठी ६ विद्यार्थी. –प्रोफेसर : एम. फिल.साठी ३ व पीएच. डी.साठी ८ विद्यार्थी.

**सेट–नेट धारकांना सीईटीमधून मिळणार सूट**

शिवाजी विद्यापीठात एम.फिल., पीएच. डी. साठी प्रवेशपुर्व परीक्षा २०१० पासून घेण्यात येते. या परीक्षेसाठी सेट–नेट धारकांना सूट दिली जात असे. गेल्यावर्षी मात्र सेट–नेट धारकांनाही प्रवेशपूर्व परीक्षा देणे बंधनकारक केले होते. त्यामुळे शिक्षण क्षेत्रात नाराजीचे वातावरण होते. शिक्षण तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार यावर्षी पुन्हा सेट–नेट धारकांना एम. फिल., पीएच. डी., प्रवेशपूर्व परीक्षेतून सूट दिली जाण्याची शक्यता आहे.



**नवीन नियमानुसार गाईडच्या अधिकारात बदल**

पुर्वी एम.फिल., पीएच. डी. साठी सर्वच मार्गदर्शकांना एकसारखे नियम होते. यामध्ये पीएच. डी. साठी ८ व एम.फिल. साठी ५ विद्यार्थ्यांना एकाच वेळी एक प्राध्यापक मार्गदर्शन करू शकत होते. मात्र, नवीन नियमानुसार यामध्ये बदल करीत असिस्टंट प्रोफेसर, असोसिएट प्रोफेसर, प्रोफेसर यांना किती विद्यार्थ्यांना एका वेळी एम.फिल., पीएच.डी.साठी मार्गदर्शन करता येईल याची नियमावली प्रशासनाने जाहीर केली आहे.

### अधिविभागांनी प्रस्ताव त्वरीत सादर करावे



कोणत्याही विद्यार्थ्यांचा शोधप्रबंध थांबवू नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. सूचना देवूनही ज्या अधिविभागांनी एम. फिल., पीएच.डी.साठीचा प्रस्ताव सादर केलेले नाहीत, त्यांच्यासाठी दोन दिवसांची मुदतवाढ दिलेली आहे. त्यामुळे संबंधीत अधिविभागांनी त्वरीत प्रस्ताव सादर करावेत. प्रस्ताव सादर झाल्यानंतर सर्वसाधारण जूनमध्येच आरआर कमिटी होईल. तसेच कोणत्या मार्गदर्शकाकडे किती विद्यार्थी आहेत, याची माहिती मागवली आहे. ही माहिती संकलीत झाल्यानंतर एम.फिल., पीएच. डी.च्या प्रवेशपुर्व परीक्षेची जाहीरात प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर जूनच्या पहिल्या किंवा दुसऱ्या आठवड्यात एम.फिल., पीएच. डी.ची प्रवेशपुर्व परीक्षा होण्याची शक्यता आहे.

**प्र–कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के**
(शिवाजी विद्यापीठ)

### आरआर कमिटीसमोर शेकडो विद्यार्थ्यांचे विविध विषय मान्यतेसाठी

- जवळपास ६०० विद्यार्थ्यांची विषय निश्चिती.
- किमान २०० विद्यार्थ्यांच्या शोधप्रबंधासाठी तोंडी परीक्षा.
- दरम्यान १०० पुर्ननोंदणी होणार
- ८ ते १० विद्यार्थ्यांचे मार्गदर्शक (गाईड) बदलणार.
- काही विद्यार्थ्यांच्या शोधप्रबंधाचे शिर्षक (टाईटल) बदलणार.
- सोशल सायन्स मधील किमान १० विद्यार्थ्यांना मराठी भाषेत लिखाण करण्यास मिळणार परवानगी.

### आरआर कमिटी म्हणजे काय?

- एम. फील व पीएच. डी. संशोधन विषयास अंतिम मान्यता देते.
- संशोधन आराखड्याला मान्यता देणे
- निवड केलेल्या विषयात काही चुका असतील तर दुरुस्ती सुचवते.
- एफ. फिल. किंवा पीएच. डी.च्या संशोधन शिर्षकास मान्यता देणे
- शोधप्रबंधाच्या शिर्षकात चुका असतील तर दुरुस्तीसह अंतिम मान्यता देते.
- संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक (गाईड) देण्यास मान्यता देते.
- संशोधन प्रबंधाला अंतिम मान्यता देते.

9 MAY 2018
जनसंपर्क कक्ष
लोकमत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्रवेश परीक्षांसाठी 'प्रश्न बँक'

## शिवाजी विद्यापीठ : कार्यक्षेत्रातील २४ केंद्रांवर सर्व परीक्षा ऑनलाईन

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विविध पदव्युत्तर अभ्यासक्रमांसाठी दि. २२ ते २९ मेदरम्यान प्रवेश परीक्षा होणार आहे. यावर्षी पहिल्यांदाच सर्व अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने होणार आहेत. त्यासाठी या अभ्यासक्रमांच्या प्रश्न बँक (क्वेश्चन बँक) तयार करण्यात आली आहे.

विद्यापीठातर्फे दरवर्षी एम. ए., एम. एस्सी. जिओग्राफी, एम. ए. मास कम्युनिकेशन, एम.एस्सी. अल्कोहल टेक्नॉलॉजी, बी.जे., एम.जे., एम.एस्सी. शुगर टेक्नॉलॉजी, ॲग्रो केमिकल ॲण्ड पेस्ट मॅनेजमेंट, एम. एस्सी. जिओलॉजी, एम. एस्सी. इलेक्ट्रॉनिक्स अशा विविध २९ विषयांसाठी प्रवेश परीक्षा घेतली जाते. गेल्यावर्षी सात अभ्यासक्रम वगळता अन्य अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑफलाईन पद्धतीने घेण्यात आल्या. विद्यापीठाच्या परीक्षाविषयक कामकाजात माहिती व तंत्रज्ञानाचा अधिक वापर करण्याच्या उद्देशाने या वर्षीपासून २९ अभ्यासक्रमांच्या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहेत. त्यानुसार दि. २२ ते २९ मेदरम्यान ऑनलाईन पद्धतीने प्रवेश परीक्षा होतील. फॅकल्टी चेंज ही परीक्षा दि. २३ मे रोजी ऑफलाईन पद्धतीने होईल. ऑनलाईन परीक्षा या विद्यापीठ कार्यक्षेत्रातील विविध अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या संगणक प्रयोगशाळांमध्ये होणार आहे. परीक्षांसाठी कोल्हापूरमध्ये १३, सांगलीत पाच आणि सातारा जिल्ह्यांत सहा केंद्रे आहेत.



| 29 | 24 |
|---|---|
| प्रवेश परीक्षा होणारे अभ्यासक्रम | एकूण परीक्षा केंद्रे |

"यंदाच सर्व प्रवेश परीक्षा ऑनलाईन होणार असून २२ अभ्यासक्रमांच्या प्रश्न बँक तयार झाल्या आहेत. उर्वरित अभ्यासक्रमांबाबतची कार्यवाही सुरु आहे. परीक्षा केंद्र, समन्वयक यांची निश्चिती झाली आहे. पर्याय म्हणून ओएमआर शीटस्‌ची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे.

– महेश काकडे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

9 MAY 2018
तरूण भारत

# व्यवस्थापन परिषदेवर डॉ. पाटील, डॉ. कोरबू

कोल्हापूर

दरम्यान, व्यवस्थापन परिषदेवर दोन सदस्यांची निवड करण्यासाठीची प्रक्रिया नुकतीच पार पडली. यात घेण्यात आलेल्या मतदानात डॉ. रसूल कोरबू व डॉ.भारती पाटील यांना बहुमत मिळाल्याने त्यांना विजयी घोषित करण्यात आले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्या परिषदेची बैठक नुकतीच विद्यापीठ कार्यालयात झाली. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. तर सचिवपदी कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर होते.

बैठकीत शिवाजी विद्यापीठातंर्गत सुरू



डॉ. भारती पाटील



डॉ. रसूल कोरबू

असलेल्या बी.ए, बी.कॉम व बी.एस्सी. अभ्यासक्रमांना चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्मिट लागू करण्यास मान्यता देण्यात आली. त्यासाठी आवश्यक अभ्यासक्रमाची रचना, नियमावलीसही मान्यता देण्यात आली. विद्यापीठात पी.जी. डिप्लोमा इन ई-गव्हर्नंस हा अभ्यासक्रम सुरू करण्यावर एकमत झाले. विद्यापीठातंर्गत बी.कॉम, एम. कॉम अभ्यासक्रमातंर्गत वस्तू व सेवा कर अर्थात जी.एस.टी.चा समावेश करण्यासही मान्यता दर्शवण्यात आली. शिक्षक गटातून डॉ. रसूल कोरबू यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. महिला गटात डॉ. भारती पाटील व शर्मिला साबळे हे दोन उमेदवार असल्याने मतदान प्रक्रिया पार पडली. यात डॉ. पाटील यांना २६ तर साबळे यांना ८ मते पडली. त्यामुळे भारती पाटील यांना विजयी जाहीर करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 MAY 2018
तरुण भारत

# विद्यापीठातील वाणिज्य विभागाच्या माजी विद्यार्थ्यांचा शनिवारी मेळावा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या माजी विद्यार्थ्यांचा मेळावा शनिवार १२ रोजी दुपारी १ वाजता होणार आहे. विद्यापीठाच्या व विभागाच्या वाटचालीमध्ये माजी विद्यार्थ्यांचे योगदान वाढविणे. सध्याच्या विद्यार्थांसमोरील आव्हाने, उद्योग, व्यवसाय व संस्था यांच्या विद्यार्थ्यांकडून अपेक्षा समजावून घेणे. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्व विकासामध्ये अधिविभागाचे योगदान व अभ्यासक्रमा विषयी सूचना याबाबाबत चर्चा करणे. माजी विद्यार्थी, शिक्षक व सध्याचे विद्यार्थी यांच्यामध्ये सुसंवाद निर्माण करणे. विद्यार्थ्यांची रोजगाराभिमुखता वाढवण्यासाठी माजी विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे या उद्देशाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. तरी सर्व माजी विद्यार्थांनी मोठ्या संख्येने या मेळाव्याला उपस्थित राहावे, असे आवाहन विभागप्रमुख प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 MAY 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठात शनिवारी माजी विद्यार्थी मेळावा

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाच्या वतीने माजी विद्यार्थी मेळाव्याचे आयोजन रविवारी (दि. १२) दुपारी एक वाजता करण्यात आले आहे. प्रस्तावित प्रकल्प, विद्यापीठाच्या व विभागाच्या वाटचालीमध्ये माजी विद्यार्थ्यांचे योगदान वाढविणे, सध्याच्या विद्यार्थांसमोरील आव्हाने आदी विविध विषयांवर यावेळी सुसंवाद साधला जाणार आहे. माजी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने या मेळाव्याला उपस्थित राहावे, असे आवाहन विभागप्रमुख प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
9 MAY 2018
लोकमत

# विद्यापीठात शनिवारी माजी विद्यार्थी मेळावा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागातर्फे शनिवारी (दि. १२) दुपारी एक वाजता माजी विद्यार्थी मेळावा होणार आहे. विद्यापीठाच्या व विभागाच्या वाटचालीमध्ये माजी विद्यार्थ्यांचे योगदान वाढविणे, सध्याच्या विद्यार्थ्यांसमोरील आव्हाने, उद्योग, व्यवसाय व संस्थांच्या विद्यार्थ्यांकडून अपेक्षा समजावून घेणे, विद्यार्थ्यांची रोजगाराभिमुखता वाढविण्यासाठी माजी विद्यार्थ्यांचा सहभाग वाढविणे, या उद्देशाने हा मेळावा आयोजित केला असल्याची माहिती विभागप्रमुख प्रा. डॉ. ए. एम. गुरव यांनी दिली.